# विद्यार्थी बनविणार मेट्रो स्थानकांचा आराखडा

मुंबई, ता. ३ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) कुलाबा-वांद्रे-सीप्झ भूमिगत मेट्रो-३ मार्गाचे काम वेगाने सुरू आहे. मार्गावरील तीन स्थानकांचा आराखडा बनवण्यासाठी मुंबईतील विविध आर्किटेक्ट आणि इंजिनियरिंग महाविद्यालयांमधील ९५ विद्यार्थी अथक परिश्रम घेत आहेत. मेट्रो स्थानक व त्याच्या आसपासचा परिसर कसा असावा, याबाबत विद्यार्थी आराखडा तयार करत आहेत.

मेट्रो-३चे काम प्रगतिपथावर असून या मार्गावर २७ स्थानके असून त्यातील २६ स्थानके भूमिगत;तर एक उन्नत आहे. त्यापैकी तीन स्थानके आणि त्यांच्यालगतचा परिसर कसा असावा, याबाबतचा आराखडा बनवण्याचे काम आर्किटेक्चर आणि इंजिनियरिंग महाविद्यालयामधील ९५ विद्यार्थ्यांवर सोपवले आहे. आरखडा तयार करण्यासाठी एमएमआरसीने 'ऑब्जर्व्हर रिसर्च फाऊंडेशन'च्या सहकार्याने मुंबईतील आर्किटेक्चर व इंजिनियरिंग विद्यार्थ्यांसाठी एक स्पर्धा घेतली. त्यात मुंबईतील ५१ महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या विविध ५१ गटांनी तयार केलेल्या आराखड्यातून १९ गटाच्या आराखड्यांची निवड करण्यात आली. त्यांना आराखड्याचा विस्तृत अहवाल सादर करण्यास एमएमआरसीकडून सांगण्यात आले. निवड झालेला अंतिम आराखडा आणि अहवाल नोव्हेंबर महिन्यात मेट्रोचे वरिष्ठ अधिकारी आणि मुख्यमंत्र्यांसमोर सादर केला जाणार आहे.